महाराष्ट्र शासन

# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र. तंशिप्र-१२२४/प्र.क्र. ०३/प्रवेशाचा अंतिम सुधारीत दिनांक/२०२४/१७५७ दिनांक :- ०३/१०/२०२४

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता तंत्रशिक्षण विभागांतर्गत असलेल्या विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचा प्रवेशासाठीचा सुधारीत अंतिम दिनांकाबाबत..**

मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल IA No २१०५३८/२०२४, दिनांक २३.०९.२०२४ मधील आदेशानुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली (AICTE) या शिखर परीषदेद्वारे त्यांनी त्यांचे परिपत्रक क्र. AICTE/RB-AC-cir/२०२४ दिनांक २४ सप्टेंबर, २०२४, अन्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता सुधारीत वेळापत्रक घोषित केले आहे. एआयसीटीईच्या सुधारीत वेळापत्रकानुसार रिक्त जागांसाठी प्रवेश करण्याचा अंतिम दिनांक २३.१०.२०२४ हा आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता तंत्रशिक्षण विभागांतर्गत असलेल्या विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील शासकीय, शासकीय अनुदानित, विद्यापिठ संचालित व खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांच्या प्रथम वर्षाच्या आणि द्वितीय वर्षाच्या खालील तक्त्यात नमुद अभ्यासक्रमांच्या कॅपनंतर रिक्त राहीलेल्या जागा व संस्थास्तरावरील कोटयामधील रिक्त जागांच्या प्रवेश प्रक्रियेकरीता नॉन कॅप नोंदणी प्रक्रिया व प्रवेश प्रक्रिया खालील नमुद दिनांकापासून पुन्हा सुरु करण्यात येत आहे.

| अ.क्र | अभ्यासक्रमाचे नाव | नॉन कॅप नोंदणी दिनांक | प्रवेशासाठीचा अंतिम दिनांक | डेटा अपलोड करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| | **पदव्युत्तर पदवी** | | | |
| १. | एमसीए | ०३-१०-२०२४ | २३-१०-२०२४ | २३-१०-२०२४ |
| | **पदवी** | | | |
| २. | थेट द्वितीय वर्ष फार्मसी | ०३-१०-२०२४ | २३-१०-२०२४ | २३-१०-२०२४ |

**टिप :-**

१. **प्रवेश प्रक्रियेच्या कॅप व्यतिरीक्त जागांसाठी ऑनलाईन नोंदणी (दुपारी १ वाजेपर्यंत) व कागदपत्रांची पडताळणी आणि अर्ज निश्चिती करणे (दुपारी ०३ वाजेपर्यंत) या प्रक्रिया प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंत (कट ऑफ डेट पर्यंत) सुरु ठेवल्या जातील.**

२. **कॅपनंतर रिक्त राहीलेल्या जागा व संस्थास्तरावरील रिक्त जागांकरीता प्रवेश घेण्यास इच्छूक उमेदवारांना ई- स्क्रूटीनी पध्दत किंवा प्रत्यक्ष पडताळणी स्क्रुटीनी पध्दत याद्वारे नोंदणी, कागदपत्रांची पडताळणी व अर्ज भरल्याची निश्चिती करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी प्रवेशांसाठी संस्थामध्ये स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांची गुणवत्ता यादी, संस्था पातळीवर संस्थेद्वारे तयार केली जाईल.**

३. **प्रवेशासाठी पात्रता, नियम व माहिती पुस्तिका संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.**

४. **अधिक माहितीसाठी व इतर अभ्यासक्रमांच्या सुधारीत वेळापत्रकासाठी उमेदवार, पालक व संस्थांनी www.mahacet.org यासंकेतस्थळावर भेट द्यावी.**

**सही/-**
**आयुक्त,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**